महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१७ वे | दिनांक : ०२/०८/२०२६ | वार : रविवार

## १८ कोटींच्या दानचोरीच्या आरोपांनी सिद्धिविनायक मंदिरात खळबळ; राज ठाकरेंच्या आरोपांना विश्वस्तांचे उत्तर





**मुंबई** : मुंबईतील प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरातील दानपेटीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी अपहाराच्या चर्चेदरम्यान मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सिद्धिविनायक मंदिरातही दरवर्षी 18 कोटी रुपयांची चोरी होत असल्याचा दावा केल्याने हा विषय अधिकच चर्चेत आला. मात्र, या दाव्यानंतर सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष तथा आमदार सदा सरवणकर यांनी हा दावा फेटाळत स्पष्टीकरण दिले असून, गैरसमज निर्माण झाल्याचे म्हटले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात सिद्धिविनायक मंदिराच्या काही विश्वस्तांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रापासून झाली. या पत्रात मंदिरातील दानपेटीतील आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर शंका उपस्थित करण्यात आली आहे. पत्रानुसार, मंदिरातील काही कर्मचारी दानपेटीतील पैशांची अफरातफर करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, अशा नऊ कर्मचाऱ्यांना पकडण्यात आल्याचा उल्लेख आहे. तसेच या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर सखोल चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. सिद्धिविनायक मंदिर विश्वस्तांनी पत्रात नमूद केलेल्या आकडेवारीनुसार, संबंधित कर्मचारी पकडण्यापूर्वी प्रत्येक बुधवारी दानपेटीतून साधारण 50 लाख रुपयांपर्यंत रक्कम जमा होत होती. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई झाल्यानंतर सलग तीन आठवड्यांत दान रक्कम थेट दीड कोटी रुपयांच्या आसपास पोहोचल्याचे नमूद करण्यात आले आहे. याच आधारावर यापूर्वी दानपेटीतील काही रक्कम नियमितपणे लंपास होत असावी, असा संशय विश्वस्तांनी व्यक्त केला. या संभाव्य फरकाचा वार्षिक हिशोब मांडत त्यांनी मंदिराला दरवर्षी सुमारे 18 कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा अंदाज व्यक्त केला. मात्र, हा निष्कर्ष संशयाच्या आधारे मांडण्यात आला असून, अधिकृत चौकशी अहवाल अद्याप समोर आलेला नाही. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत आयोजित मेळाव्यात राज ठाकरे यांनी हे पत्र सार्वजनिकपणे वाचून दाखवत सरकारवर जोरदार टीका केली. राम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराचा उल्लेख करत राज ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला की, धार्मिक श्रद्धेच्या केंद्रस्थानी असलेल्या मंदिरांमध्येच जर आर्थिक गैरव्यवहार होत असतील, तर सरकारने त्यावर स्पष्ट भूमिका का घेत नाही? यावेळी त्यांनी विश्वस्तांच्या पत्रातील मजकूर उद्धृत करत सिद्धिविनायक मंदिरातून दरवर्षी 18 कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा दावा केला. मंदिरातील दानावर भाविकांचा विश्वास असतो, त्यामुळे अशा आरोपांची गंभीर चौकशी होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. पत्रातील मजकुरानुसार विश्वस्तांनी थेट 18 कोटी रुपयांची चोरी झाल्याचा निष्कर्ष नोंदवलेला नाही. त्यांनी दानरकमेतील अचानक झालेली वाढ आणि कर्मचाऱ्यांवरील कारवाई या दोन बाबींचा संदर्भ देत, पूर्वी काही रक्कम अपहाराद्वारे बाहेर जात असावी, असा संशय व्यक्त केला आहे. तसेच या प्रकरणाचे धागेदोरे वरिष्ठ पातळीपर्यंत असू शकतात, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली असून, त्यासाठी स्वतंत्र चौकशीची मागणी केली आहे. राज ठाकरे यांच्या वक्तव्यानंतर सिद्धिविनयक मंदिर न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी संपूर्ण प्रकरणावर भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, विश्वस्तांनी सरकारला दिलेल्या पत्रामुळे नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण झाला आहे. पत्रात कुठेही "18 कोटींची चोरी झाली" असा स्पष्ट उल्लेख नसल्याचे त्यांनी सांगितले. सरवणकर यांनी स्पष्ट केले की, मंदिरात गेल्या दोन वर्षांत प्रशासनिक स्तरावर अनेक सुधारणा करण्यात आल्या असून त्याचा सकारात्मक परिणाम मंदिराच्या उत्पन्नावर झाला आहे. सदा सरवणकर यांनी दानरकमेतील वाढीमागे काही महत्त्वाच्या कारणांचा उल्लेख केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी काही कंत्राटी कर्मचारी दर्शनासाठी ऑनलाइन पद्धतीने, विशेषतः GPay द्वारे, अनधिकृतरीत्या पैसे घेत असल्याचे निदर्शनास आले होते. हे लक्षात आल्यानंतर संबंधित 19 कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. त्यानंतर त्यांच्याकडून शपथपत्रही घेण्यात आले.

## अँटिलिया-हिरेन प्रकरणी १० जणांवर आरोप निश्चित



**मुंबई** : देशातील उद्योगपती आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' या निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी ठेवल्याप्रकरणी आणि व्यावसायिक मनसुख हिरेन यांच्या हत्येप्रकरणी एक मोठी अपडेट समोर आली आहे. मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने या बहुचर्चित प्रकरणात बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि माजी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्यासह एकूण दहा जणांवर अधिकृतरीत्या आरोप निश्चित केले आहेत. यामुळे तब्बल पाच वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर या हायप्रोफाइल खटल्याच्या प्रत्यक्ष सुनावणीचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.

आरोपींनी दाखल केलेले डिस्चार्ज अर्ज आणि विविध कायदेशीर प्रक्रियांमुळे गेली पाच वर्षे आरोप निश्चितीची प्रक्रिया रखडली होती. मात्र, आता विशेष न्यायालयाने कठोर पावले उचलत या सर्व आरोपींविरुद्ध बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा (UAPA) आणि भारतीय दंड संहितेतील हत्या, गुन्हेगारी कट रचणे यांसारख्या अत्यंत गंभीर कलमांखाली आरोप निश्चित केले आहेत. या निर्णयामुळे आता साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याची प्रक्रिया सुरू होऊन खटल्याची सुनावणी वेगाने पुढे सरकणार आहे.

दक्षिण मुंबईतील मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' या निवासस्थानाजवळ 25 फेब्रुवारी 2021 रोजी एक बेवारस संशयित स्कॉर्पिओ गाडी उभी असल्याचे आढळले होते. या गाडीची तपासणी केली असता त्यात जिलेटिनच्या 20 कांड्या आणि थेट धमकी देणारे एक पत्र सापडले होते. या घटनेमुळे संपूर्ण देशात आणि राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली होती.

या धक्कादायक घटनेच्या अवघ्या 10 दिवसांत, म्हणजेच 5 मार्च 2021 रोजी संबंधित स्कॉर्पिओ गाडीचे मालक मनसुख हिरेन यांचा मृतदेह मुंब्रा येथील खाडीत अत्यंत संशयास्पद स्थितीत आढळून आला. मनसुख हिरेन यांची हत्या पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि त्यांच्या साथीदारांनीच घडवून आणल्याचा थेट आणि गंभीर आरोप हिरेन यांच्या कुटुंबीयांनी केला होता.

या प्रकरणाचा प्राथमिक तपास महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाकडे होता. मात्र, प्रकरणाची व्याप्ती आणि गांभीर्य विचारात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाने हा तपास तात्काळ राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग केला. 'एनआयए'ने तपासाची चक्रे वेगाने फिरवत मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचत घटनेचा मुख्य सूत्रधार आणि कट रचल्याप्रकरणी सचिन वाझे, कटात सहभाग आणि पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा, विनायक शिंदे, नरेश गोर, रियाझुद्दीन काझी यांच्यासह एकूण 10 जणांना बेड्या ठोकण्यात आल्या.

या प्रकरणात आरोपींकडून दाखल करण्यात आलेले डिस्चार्ज अर्ज आणि विविध कायदेशीर याचिकांमुळे आरोप निश्चित करण्याची प्रक्रिया दीर्घकाळ प्रलंबित होती. अखेर विशेष न्यायालयाने सर्व अर्जांवरील सुनावणी पूर्ण करून आरोप निश्चित केले आहेत. आता साक्षीदारांची साक्ष, पुराव्यांची नोंद आणि अन्य न्यायालयीन प्रक्रिया सुरू होणार असल्याने या हायप्रोफाइल प्रकरणाच्या सुनावणीला गती मिळण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६


## इकरा स्कूलमध्ये AI लिटरसी परीक्षा






**जळगाव :** आजच्या डिजिटल युगात लहान मुलांचा मोबाईलचा वापर मुख्यतः रील्स पाहणे,सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेमिंगपुरता मर्यादित राहिला आहे.मात्र,याच तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कसा होऊ शकतो,याचा एक आदर्श वस्तुपाठ जळगाव येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने घालून दिला आहे.शाळेत नुकतीच 'AI लिटरसी अँड प्रॉम्प्ट क्राफ्टिंग' (AI Literacy & Prompt Crafting) ही अनोखी परीक्षा अत्यंत उत्साहात पार पडली.विद्यार्थ्यांना AI, ChatGPT आणि Google Gemini यांसारख्या अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांचा योग्य, अचूक आणि प्रभावी वापर कसा करावा,तसेच तंत्रज्ञानाला योग्य 'प्रॉम्प्ट' (सूचना/प्रश्न) देऊन अपेक्षित ज्ञान कसे मिळवावे,याचे प्रशिक्षण व मूल्यमापन करणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश होता.या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार दोन स्वतंत्र गट करण्यात आले होते.यामध्ये इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थ्यांचा 'ज्युनिअर गट' आणि इयत्ता 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांचा 'सिनिअर गट' समाविष्ट होता.सर्व विद्यार्थ्यांनी घरून आणलेल्या मोबाईल व टॅबलेट्सच्या माध्यमातून थेट डिजिटल शोध घेतला. प्रश्नपत्रिकेत केवळ थेट उत्तरांऐवजी संकल्पनात्मक विचारसरणीला वाव देणाऱ्या AI एथिक्स,गणित,विज्ञान, सामाजिक शास्त्रे,तर्कशास्त्र (Reasoning) आणि भाषा या विषयांचा समावेश होता.विद्यार्थ्यांनी AI टूल्सच्या साहाय्याने अचूक उत्तरे शोधून ती आपापल्या उत्तरपत्रिकेत नोंदवली.परीक्षा सुरू असताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर तांत्रिक उत्सुकता आणि उत्तर शोधण्याची धडपड स्पष्ट दिसत होती.या उपक्रमामुळे "मोबाईल हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून अभ्यासातील क्लिष्ट संकल्पना सोप्या करणारा एक शक्तिशाली 'स्टडी टूल' आहे", याची प्रचिती विद्यार्थ्यांना आली.या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दोन्ही गटांतील प्रथम तीन विजेत्यांना शाळेच्या वतीने विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.या नाविन्यपूर्ण आणि स्तुत्य उपक्रमाच्या यशाबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.करीम सालार आणि एजाज मलिक साहेब यांनी शाळा प्रशासन, शिक्षक व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.याप्रसंगी बोलताना डॉ.करीम सालार यांनी नमूद केले की, "20 वे शतक हे ज्ञानाचे शतक होते, मात्र 21 वे शतक हे 'AI' चे शतक आहे.ज्या पिढीला या तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवता येईल, तीच पिढी भविष्यात जगावर राज करेल." शाळेच्या या क्रांतीकारी उपक्रमाचे शैक्षणिक वर्तुळात आणि पालकांमध्ये उदंड कौतुक होत आहे.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी




**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात इतिहास विभागाचे वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. "अण्णाभाऊ साठे यांचे जीवन अतिशय संघर्षमय असतानाही त्यांच्या हातून अभिजात साहित्याची सेवा घडली. ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दिनदलितांच्या तळहातावर आणि श्रमावर तरली आहे हेच अण्णाभाऊ यांच्या साहित्याचे तत्वज्ञान आहे. फकिरा सारखी अत्युच्च दर्जाची कादंबरी लिहून अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. जवळपास 30ते35 कादंबऱ्या लिहून अण्णाभाऊंनी एक लेखक म्हणून स्वतःला सिद्ध केले. जग बदल घालुनी घाव, सांगुनी गेले मला भीमराव अशी अर्पणपत्रिका लिहून त्यांनी आपल्या साहित्याचे प्रयोजन आणि भूमिका स्पष्टपणे मांडली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊ साठे यांचे योगदान नाकारता येत नाही असे " सांगून प्रा. डॉ. विनोद धनेराव यांनी आपल्या छोटेखानी भाषणात अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्वाचे अनेक वैशिष्ट्ये सांगितली. तसेच लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान स्पष्ट करताना त्यांना असंतोषाचे जनक का म्हटले जाते याविषयी माहिती दिली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. एम. जी आंभुसे आणि प्रा.डॉ.पी.एस.राऊत ही होते.प्रारंभी अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सविस्तर आभार इतिहास विभागप्रमुख प्रा. अरविंद राठोड यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक , प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## बारवाले महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती, टिळक पुण्यतिथी साजरी



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. संभाजी कांबळे यांनी अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या योगदानावर प्रकाश टाकला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६

## ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** येथील बेगमपुरा भागातील ज्ञानेश्वर विद्यालयात मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम विद्यालयातील 'कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ सभागृहात' संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका स्वाती महाजन या उपस्थित होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक संभाजी तांगडे आणि प्रमुख वक्ते म्हणून भरत झोडपे व संतोष अधाने यांनी मंचावर उपस्थिती दर्शवली.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या दुहेरी औचित्यासाधून विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध वर्गांतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.यावेळी प्रमुख वक्ते भरत झोडपे आणि संतोष अधाने सर यांनी आपल्या भाषणातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक या दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर व विचारांवर सविस्तर प्रकाश टाकला आणि उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.*वक्तृत्व स्पर्धेचा निकाल व बक्षीस वितरण*कार्यक्रमादरम्यान वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आणि मान्यवरांच्या हस्ते सर्व विजयी स्पर्धकांना बक्षिसांचे वाटप करून गौरविण्यात आले. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे राहिला: * *प्रथम क्रमांक:* आर्यंत डोंगराज (इयत्ता ९ वी) * *द्वितीय क्रमांक:* अवनी मिटकर * *तृतीय क्रमांक:* करण निकाळजे * *उत्तेजनार्थ:* रुद्राक्षी सोळशेया सुबक आणि नेटक्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रवींद्र साठे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मंगला सुलताने यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता अध्यक्षांच्या प्रेरणादायी भाषणाने करण्यात आली. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनपा प्रा. व मा. विद्यालय चिकलठाणा



**छत्रपती संभाजीनगर :** लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यासाठी अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री राठोड सर आणि प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती बेबी राऊत मॅडम. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संगीता चव्हाण मॅडम यांनी केले. कार्यक्रमासाठी श्री वाघ सर. श्री पठाण सर. श्रीमती मनीषा शिंदे मॅडम. श्रीमती अरुणा फुलंब्रीकर मॅडम श्री सूर्यवंशी सर व सेविका सुजाता भोसले मावशी हे सर्व उपस्थित होते. व सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. आणि सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

## अय्युब पठाण लोहगावकर यांचा भव्य सत्कार



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** हडको येथील गोदावरी पब्लिक स्कूल आणि उच्च माध्यमिक शाळा छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच प्रसिद्ध कवी तथा लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांचा गोदावरी पब्लिक स्कूलच्या प्राचार्या शुभांगीताई विक्रमजी काळे यांच्या हस्ते पुष्पहार, शाल, श्रीफळ व बुके देऊन भव्य सत्कार करण्यात आला आहे. लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंती निमित्ताचे औचित्य साधून आणि लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांचा पाठ बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाच्या मराठीभाषा या पाठ्यपुस्तकात जून २०२६ पासून अभ्यासक्रमात "कौतुकाची थाप" हे पाठ संपूर्ण महाराष्ट्राच्या प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्याने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर. या विद्यापीठामध्ये बीए तृतीय वर्षाच्या सहाव्या सत्रासाठी "गंध फुलांचा" ही कविता मराठवाड्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयाच्या बीए तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात या कवितेची निवड झाल्याने ती अध्यापनात शिकवली जाणार आहे. त्यानिमित्ताने श्री. अय्युब पठाण यांचा भव्य सत्कार करण्यात आला आहे. याप्रसंगी मराठवाड्याचे लोकप्रिय शिक्षक आमदार विक्रमजी वसंतराव काळे आणि शिक्षण महर्षी बाळासाहेब पवार यांच्यासह प्रदीप विखे, कवी मनोज खुटे आणि गोदावरी पब्लिक स्कूलच्या सर्व शिक्षक शिक्षिका आणि विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कालिकादेवी विद्यालयात,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी




**शिरूर (प्रतिनिधी) :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथे,'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.याप्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी,साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून दीन-दलित,अपेक्षित,शोषित व वंचित समाजातील माणसांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला आणि दु:ख-वेदनेला वाचा फोडण्याचे मोठे कार्य केले आहे.त्यांचे साहित्य प्रखर राष्ट्रवादी आणि वास्तववादी होते.त्यांच्यातली साहित्यप्रतिभा अद्वितीय होती.म्हणूनच महाराष्ट्र शासनाने, एक ऑगस्ट हा दिवस 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा जो निर्णय घेतला आहे.तो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक आहे.तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील पहिले स्वातंत्र्यसेनानी होते.ब्रिटिश राजवटीतील भारतीय स्वराज्याचे पहिले व खंबीर पुरस्कर्ते होते.म्हणून या दोन्ही विचारवंताचे कार्य आपण सर्वांनीच आत्मसात केले पाहिजे,असे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान विभाग प्रमुख,प्रा.संजय काकडे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे, प्रा.महादेव हांगे, प्रा.नारायण घोलप, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता शिंदे, प्रा.रविंद्र संकपाळे, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे, रविंद्र बडे, आप्पासाहेब कांबळे, विनायक सुरवसे, राजू बडे, रवी जोशी, नितीन बहिर,रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, नंदकुमार जाधव, विलास कांबळे, गौतम भोसले,यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री जयेंद्र निकम यांनी केले.यावेळी कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६


## तिफण वाचक पुरस्कार भारत सोनवणे यांना जाहीर



**कन्नड (प्रतिनिधी) :** त्रैमासिक तिफण आणि तिफण वाचक चळवळ , भाषा, साहित्य , संस्कृती आणि संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट महिन्याच्या तिसऱ्या रविवारी जामुवंतगड येथे संपन्न होणाऱ्या तिफण राज्यस्तरीय लेखक-वाचक मेळाव्यात देण्यात येणारा 'तिफण वाचक पुरस्कार' यंदा भारत लक्ष्मण सोनवणे यांना जाहीर करण्यात आला आहे.गेली सात वर्षे सातत्याने लेखन, वाचन आणि पुस्तक परीक्षण या क्षेत्रात कार्यरत असलेल्या भारत सोनवणे यांची साहित्यिक जडणघडण तिफण वाचक चळवळ आणि तिफण कविता महोत्सवातून झाली आहे. कन्नड येथे ते तिफण परिवाराशी जोडले गेले. तेव्हापासून त्यांनी वाचन चळवळीच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे.एम.बी.ए. पदवीधर असलेले भारत सोनवणे हे व्यवसायाने व्यवस्थापन क्षेत्रातील असले तरी मनाने पूर्णपणे साहित्याशी जोडले गेले आहेत. 'Writing From a Blank Mind' या त्यांच्या ब्लॉगवर त्यांनी साडेतीनशेहून अधिक लेख लिहिले आहेत. तसेच सकाळ, लोकमत, दिव्य मराठी, केसरी यांसारख्या दैनिकांमध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध होतात. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमधील दीडशेहून अधिक पुस्तकांचे परीक्षण त्यांनी लिहिले आहे.उत्तम वाचक म्हणून ओळख असलेल्या भारत सोनवणे यांनी वाचन संस्कृती रुजवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन तिफण परिवाराने त्यांना या वर्षीचा तिफण वाचक पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे.हा पुरस्कार जामुवंतगड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय तिफण लेखक वाचक मेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहित तिफण लेखक वाचक मेळाव्याचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी दिली. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा पा. जाधव संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, स्वागताध्यक्ष कल्याणराव खडके, तिफण वाचक चळवळ चे अध्यक्ष डॉ. दिलीप बिरुटे, कार्याध्यक्ष डॉ. रामचंद्र झाडे, उपाध्यक्ष डॉ. सुवर्णा गुंड चव्हाण, कन्नड शाखेचे अध्यक्ष प्रविण दाभाडे, सचिव अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, संदीप ढाकणे, संदीप वाकडे, भीमराव सोनवणे, श्रीराम दापके, सुरेश औटे, अनिता राठोड, शुभदा देवरे आदींनी अभिनंदन केले.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद; ९० उमेदवारांची अंतिम निवड




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर यांच्या आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर दिंडोरी प्रणित नाशिक शाखा जिंतूर संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.या रोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रांतील १६ नामांकित आस्थापनांनी सहभाग नोंदविला. मेळाव्यास १७० सुशिक्षित बेरोजगार उमेदवार उपस्थित होते. त्यापैकी १३६ उमेदवारांची प्राथमिक निवड, तर ९० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. त्यामुळे अनेक युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. खंडेराव भिसे, प्राचार्य, श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मिटकुळे सर, प्राचार्य, श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाधान किरवले, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी केले.रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये योगेश येडपलवार (कनिष्ठ कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी), राहुल गजभारे, सचिन चव्हाण, राहुल काळे, प्रियंका कणके, शीला भालेराव, आणि विवेक भारती, अमित घुगे, किरण गजमल यांचा सक्रिय सहभाग होता.रोजगार मेळाव्यामुळे परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले.

## पार-गोदावरी नदीजोड व पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यात वळविण्याची मागणी




**कन्नड (अरुण थोरात) :** मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीच्या वतीने मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांना न्याय पाणी वाटप, पार-गोदावरी नदीजोड योजना तसेच कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याकडे वळविण्याच्या मागण्यांसंदर्भात राज्याचे समाजकल्याण मंत्री तथा संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले आहे.यावेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब शिंदे यांनी मराठवाड्यातील सिंचन अनुशेष 05 लाख हेक्टर पर्यंत वाढलेले असून दुष्काळी परिस्थिती आणि रखडलेल्या जलसंपदा प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती देत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केलीनिवेदनात नूसार, मराठवाडा हा कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त व अवर्षणप्रवण प्रदेश असून सिंचनाचा अनुशेष अजूनही मोठ्या प्रमाणात बाकी आहे. सन 2011 पासून विविध अहवाल, डीपीआर आणि शासन निर्णयांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होऊनही प्रत्यक्षात प्रकल्पांची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. संघर्ष समितीने पार-गोदावरी नदीजोड योजनेअंतर्गत गोदावरी खोऱ्यात मोठ्या प्रमाणात पाणी वळविण्याची क्षमता असल्याचा दावा केला आहे. तसेच कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांचे अतिरिक्त पाणी मराठवाड्यात आणल्यास छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोलीसह अनेक जिल्ह्यांतील दुष्काळी भागांना मोठा दिलासा मिळू शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.समितीने विशेषतः वैजापूर, गंगापूर, कन्नड तसेच जालना जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांना या योजनांमुळे सिंचन व पिण्याच्या पाण्याचा लाभ होईल, असे स्पष्ट केले आहे. यासोबतच मराठवाड्यासाठी आरक्षित करण्यात आलेले पाणी विनाविलंब उपलब्ध करून देणे, जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक आयोजित करणे आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र यंत्रणा नियुक्त करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संघर्ष समितीने शासनाला 14 सप्टेंबर 2026 पर्यंत ठोस कार्यवाही करण्याचे आवाहन केले असून, याबाबत कार्यवाही न केल्यास 15 सप्टेंबर पासून शेतकरी व नागरिकांच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी दत्तात्रय पाटील, अशोकराव दाबके, प्रकाश अहेर, काकासाहेब काळे, रमेश वारे, डॉ. सदाशिव पाटील, श्री चौधरी , बाबासाहेब दांडगे व अशोक कुमावत यांचा समावेश होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६


## साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त




जग बदल घालून घाव मला सांगून गेले भिमराव.. जातीव्यवस्थेचे चटके बसल्याने शाळा सोडून आयुष्याच्या विद्यापीठात बरंच अनुभवलेले.. मराठी सारस्वताने जातीभेदाच्या पायावर नाकारलेले समूह, विषय आणि प्रश्न पहिल्यांदाच समर्थपणे मांडणारे वास्तववादी कलावन्त...केवळ उच्चभ्रू आणि सुंदरच असणारेच कथा, कादंबरीचे नायक-नायिका असायचे पण अण्णा भाऊंनी पहिल्यांदाच दलित, आदिवासी, भटके सौंदर्य नसले तरी शौर्य असलेले फकिरा, यंकू माकडवाला, दरवेशी याना नायक बनविले. साहित्य अकादमी पुरस्कार मिळविण्यासाठी, पैशासाठी प्रस्थापित आणि इतर दलित साहित्यिकासारखे अण्णा भाऊंची पात्रे कुठेच लाचार होत नाहीत .स्वाभिमान गहाण ठेवत नाहीत. पुरस्काराच्या आमिषाने स्त्रियांची अब्रू जगाच्या वेशीवर टांगणाऱ्या स्त्रीद्रोही, विचारद्रोही, आंबेडकर द्रोही विकाऊ साहित्यिक नव्हते. अण्णाभाऊंची पात्रे प्रसंगी मरण पत्करतात पण शरण जात नाहीत. स्त्री पात्रे कुठंही अवमानित न करता शिलभ्रष्ट न करता शिलवंत, नीतीवंत चित्रित केली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी नाळ जोडतात.. वाटेगाव ते मुबई पायी प्रवास, विविध क्षेत्रातील काम, कादंबरीकार, शाहीर, वगनाट्य, कथाकार, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, रशियाचा प्रवास, लोक प्रबोधन, कॉम्रेड.. 35 कादंबऱ्या, 13 कथासंग्रह, 14लोकनाट्य, 10 पोवाडे, 02 नाटके, एक प्रवासवर्णन आणि सात कादंबऱ्यावर आधारित सात चित्रपट निघूनही मराठी सारस्वतांनी उपेक्षितठेवलेला महान साहित्यिक... अण्णा भाऊ साठे यांच्या विद्रोही स्मृतीस विनम्रअभिवादन

**डॉ. रमाकांत पाटील,**
**धाराशिव, महाराष्ट्र.**

## श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयात लोकमान्य टिळक स्मृतिदिन व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**उमरगा** : येथील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने आज दि.1 ऑगस्ट 2026 रोजी लोकमान्य टिळक स्मृतिदिन व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.विनोद देवरकर होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये उपप्राचार्य डॉ.पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक डॉ.सुभाष इंगळे, पर्यवेक्षक प्रा.शैलेश महामुनी हजर होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रणी नेते म्हणून लोकमान्य टिळक यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्यांनी तत्कालीन ब्रिटिश राजवटीच्या विरुद्ध जनमत तयार करण्यासाठी 'केसरी' आणि 'मराठा' ही वृत्तपत्रे सुरू करून लोकांमध्ये जागृती घडवून आणली. त्यांच्या विचार आणि कार्याचे स्मरण करण्यासाठीच त्यांचा स्मृतिदिन साजरा केला जातो. त्याचबरोबर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी देखील आपल्या लेखणीच्या माध्यमातून मराठी साहित्यात मोलाची भर घातली. समाजातील शोषित, वंचित समाजाच्या वेदनेला वाचा फोडण्याचे काम त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून केले. त्यांनी अनेक कथा,कादंबरी, नाटके, शाहिरी, लोकनाट्ये, लावणी, कविता लिहून बहुजनांचे प्रश्न, समस्या, हक्क, अधिकार मांडण्याचा प्रयत्न केला. म्हणून अशा थोर सुपुत्रांचा जन्मदिवस आज लेखन-वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जात आहे, असे प्रतिपादन उपप्राचार्य डॉ.विनोद देवरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. प्रदीप पाटील यांनी केले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ.भरत शेळके, प्रा. डॉ. मनोरंजना निर्मळे, प्रा.एस.जी.जाधव, प्रा.बी.के.सुरवसे, प्रा.पी.आर.चव्हान, प्रा.ज्योती जोगदापगे तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरीच्या जैन वाचनालयात अण्णाभाऊ साठे यांची जयंती लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील कै.जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली .श्रावणी गोरे ,आराध्या टाकळकर, रुद्र चौधरी व संतोष राऊत या बालवाचकांच्या हस्ते अण्णाभाऊंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी केले.त्यानंतर दिव्या केंडे, माया गोरे ,परी नरवडे, आरोही गायकवाड, पुनम भिसे, प्रसाद सुकळे, कृष्णा नरवडे, श्रेया गायकवाड, सुवर्णा भिसे, गुंजन केंडे ,कल्याण जाधव, प्रियंका नरवडे ,रुद्र चौधरी व संतोष राऊत यांनी अण्णा भाऊंच्या पुस्तकांचे वाचन केले. त्यानंतर लेखन प्रेरणा दिनानिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या विषयावर सामान्य ज्ञान व निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेस बालवाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. चौकट***जागतिक कीर्तीचे प्रतिभावंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या मराठी साहित्यातील अमूल्य व भरीव योगदानाचा गौरव म्हणून त्यांचा जन्मदिवस १ ऑगस्ट हा लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय उच्च स्वतंत्र शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आला आहे. ग्रंथालय संचालक मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी परभणी यांच्या परिपत्रकानुसार पुस्तक वाचन, सामान्य ज्ञान व निबंध स्पर्धा आयोजित करून लेखन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. नेमीनाथ जैन, ग्रंथपाल




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६


## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकीरा' कादंबरीचा जागर करा : रवींद्र जोगदंड



**कन्नड (प्रतिनिधी) :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. युवकांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा, विशेषतः 'फकीरा' कादंबरीचा सखोल अभ्यास करून त्यांच्या समता, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा जागर करावा, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते रवींद्र जोगदंड (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका) यांनी केले.कार्यक्रमाचे उद्घाटन कन्नडच्या तहसीलदार सारिका भगत यांच्या हस्ते झाले. मार्गदर्शनपर भाषणात रवींद्र जोगदंड यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेला गौरव, त्यांच्या साहित्याचे २३ भाषांमध्ये झालेले अनुवाद तसेच सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. रशिया दौऱ्यात त्यांनी सादर केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात गाजलेली 'माझी मैना गावाकडे राहिली' ही छक्कड यांचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ वाचनापुरते मर्यादित न ठेवता ते जीवनमूल्य म्हणून स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.उद्घाटक तहसीलदार सारिका भगत यांनी अण्णाभाऊ साठे यांनी वंचित, श्रमिक आणि उपेक्षित समाजाच्या हक्कांसाठी दिलेल्या संघर्षाचा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुकरण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामधील सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन लेखन, वक्तृत्व आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे प्रतिपादन केले.यानंतर वक्तृत्व स्पर्धेला प्रारंभ झाला. स्पर्धा इयत्ता पाचवी ते दहावी आणि इयत्ता अकरावी ते पदवी अशा दोन गटांत घेण्यात आली. तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतील एकूण ४१ स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्य, साहित्य आणि विचारांवर प्रभावी मांडणी केली.स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे :माध्यमिक गट : प्रथम – प्रणिता प्रवीण काथार (साने गुरुजी माध्यमिक विद्यालय, कन्नड), द्वितीय – आकांक्षा दलपत चव्हाण (श्री संत ज्ञानेश्वर विद्यालय, कन्नड), तृतीय – संस्कृती निलेश अकोलकर (कै. काशिनाथ पाटील विद्यालय, कन्नड), उत्तेजनार्थ – सार्थक अविनाश पाखले (गौताळा व्हॅली स्कूल, कन्नड).महाविद्यालयीन गट : प्रथम – पूजा प्रमोद चव्हाण (शिवाजी महाविद्यालय, कन्नड), द्वितीय – तेजश्री राजेंद्र तारडे (सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, कन्नड), तृतीय – मनीषा बंडू महेर (जिजामाता माध्यमिक विद्यालय, पिंपरखेडा), उत्तेजनार्थ – प्रांजल मनोज महाकाळ (पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, कन्नड).स्पर्धेनंतर पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून संजय गायकवाड उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर होते. यावेळी प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी सर्व पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांनी अशा शैक्षणिक, साहित्यिक व वैचारिक उपक्रमांमध्ये सातत्याने सहभाग नोंदवून व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन लोकप्रशासन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. संजय भालेराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. संजय भालेराव, प्रा. डॉ. सीमा काशीद तसेच विविध समित्यांतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त आर्य वैश्य कोमटी समाजातर्फे वृक्षारोपण



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** आर्य वैश्य कोमटी समाजाचे नेते तथा महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री मा. ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी (दि. ३०) आर्य वैश्य कोमटी समाजाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.जिंतूर येथील जालना रोडवरील वसंत शांती विहार परिसरात सकाळी १० ते ११.३० या वेळेत झालेल्या कार्यक्रमात विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात समाजातील ज्येष्ठ नागरिक, युवक, महिला तसेच आर्य वैश्य महासभेचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.यावेळी उपस्थितांनी वृक्षलागवडीबरोबरच त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रम पावसाच्या सरीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## फुलंब्रीत साठे जयंती, टिळक पुण्यतिथी उत्साहात





**फुलंब्री :** पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक ०१ऑगस्ट २०२६ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त फुलंब्री बाजार गल्ली येथील अण्णाभाऊ साठे समाज मंदिरात गुणवंत सत्कार, व्याख्यान कार्यक्रम व ग्रंथ प्रदर्शन अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुधाकर जाधव संचालक संकल्प क्लासेस फुलंब्री व डॉ. राजश्री पवार हे लाभले होते अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रातील धनश्री कांबळे, रोशनी तुपे, स्वराज तुपे, गायत्री तुपे, कार्तिक शेजवळ व आराध्या इचके या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी भाषण केले. यानंतर गुणवंत सत्कार कार्यक्रम झाला. ज्यात डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ.नितीन माळेगावकर व श्री दयाराम कांबळे यांच्या वतीने दहावी परीक्षा उत्तीर्ण - ४,बारावी परीक्षा उत्तीर्ण - ५,पदवी परीक्षा उत्तीर्ण-२ व पोलीस झालेला १ विद्यार्थी आशा १२ विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेची पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. व्याख्यान कार्यक्रमात डॉ. सुधाकर जाधव यांनी चांगला लेखक होण्यासाठी व्यक्ती चांगला वाचक असला पाहिजे तसेच व्यक्ती जन्माने नाही तर कर्माने मोठा होत असतो असा संदेश दिला. अण्णाभाऊ साठेंचा आणि लोकमान्य टिळकांचा आदर्श घेऊन आपण देखील अधिक वाचन लेखन केले पाहिजे. आपली प्रगती ही शिक्षणातूनच होऊ शकते असे मत त्यांनी मांडले.डॉ. राजश्री पवार यांनी व्यक्तिने आपल्या कार्यक्षमता ओळखून काम केले तर तो नावारूपाला येऊ शकतो. अण्णाभाऊ साठेंनी लिहिलेले साहित्य हे समाजाचा आरसा दाखविणारे आहे. म्हणून त्यांचे सर्व साहित्य हे प्रत्येकाने वाचले पाहिजे असे मत मांडले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस आर टकले यांनी केला समारोपप्रसंगी त्यांनी महामानवांची जयंती साजरी करत असताना त्यांचे विचार आपल्या प्रत्यक्ष जीवनात आपण कसे आचरणात आणता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे असा संदेश दिला.अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या काही कथा व कादंबऱ्यांचे ग्रंथ प्रदर्शन लावण्यात आले. ज्याला माता-भगिनी व बालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. मंजुषा नळगीरकर व आभार डॉ. नितीन माळेगावकर यांनी मांडले.सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व अण्णाभाऊ साठे वस्तीतील रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६


## जिंतूर-परभणी महामार्गावर चांदजजवळ एसटी बस पलटली



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर-परभणी महामार्गावरील चांदज गावाजवळ गुरुवारी (दि. ३० जुलै) सकाळी माजलगाव आगाराची परभणीकडे जाणारी एसटी बस पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात बसमधील २६ प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव आगाराची एसटी बस सकाळी जिंतूर येथून ५१ प्रवाशांना घेऊन परभणीकडे निघाली होती. चांदज गावाजवळ आल्यानंतर अचानक चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघात होताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक नामदेव खडी यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. एसटी महामंडळाचे अधिकारी, वाहतूक विभागाचे कर्मचारी तसेच स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य सुरू करून जखमी प्रवाशांना बसमधून बाहेर काढले. त्यानंतर रुग्णवाहिकांच्या साहाय्याने सर्व जखमींना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. इतर जखमींवर जिंतूर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान,अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून चालकाचे नियंत्रण सुटल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेचा पुढील तपास संबंधित यंत्रणांकडून सुरू आहे.

## राजीव गांधी महाविद्यालयात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**करमाड :** "अण्णाभाऊ साठे हे केवळ शब्दांचे शिल्पकार नव्हते, तर शोषित, वंचित आणि कष्टकरी समाजाच्या वेदनांना वाचा फोडणारे क्रांतिवादी लोकशाहीर होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी आपल्या शाहिरी, पोवाडे आणि लोकनाट्यांच्या माध्यमातून जनमानसात स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली. 'लाल बावटा' या कलापथकाच्या माध्यमातून त्यांनी कला ही समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविली आणि मराठी लोकनाट्याला नवी दिशा दिली," असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी केले.राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागाच्या संयुक्त विद्यमाने साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, विचार, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनवादी भूमिकेचा परखड आढावा घेतला. त्यांनी 'फकिरा', 'वारणेचा वाघ' यांसारख्या साहित्यकृतींचा उल्लेख करत साठे यांच्या लेखणीतून अन्यायाविरुद्धच्या संघर्षाला शब्द मिळाले आणि उपेक्षित समाजाला आत्मसन्मानाचे बळ मिळाले, असे सांगितले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने समाजात समता, बंधुता आणि न्यायाची मूल्ये रुजविण्याचे कार्य केले असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अभ्यास करून सामाजिक परिवर्तनासाठी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुखदेव पोटदुखे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. प्रकाश बांगर यांनी केले.याप्रसंगी डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. नरेश डहाळे, डॉ. जयश्री पाटील, प्रा. मनोज देवकर, प्रा. योगेश शिंदे, डॉ. नानासाहेब लावंड, डॉ. ललित गोल्ड, प्रा. प्रशांत माटे, डॉ. इम्रान पठाण, डॉ. लक्ष्मण खरात, प्रा. तन्मय भावसार, डॉ. किशोर काळे तसेच शिक्षकेतर कर्मचारी भगवंत देशपांडे, रमेश जाधव, कैलास जाधव, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. नितीन मुळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. अण्णाभाऊ साठे यांच्या क्रांतिकारी विचारांचा जागर घडविणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी जनजागृती आवश्यक




**पुणे :** तंत्रज्ञानाच्या वेगाने वाढीमुळे गुन्हेगारीचे स्वरूपही बदलले आहे. पारंपरिक चोरी आणि दरोड्यांऐवजी आता ऑनलाइन फसवणूक, डिजिटल आर्थिक गुन्हे आणि सायबर हल्ले वाढले आहेत. सर्वसामान्य नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी पुरेशी माहिती आणि जागरूकता नसल्याने अशा गुन्ह्यांना प्रोत्साहन मिळत आहे. त्यामुळे केवळ पोलीस यंत्रणाच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाला सायबर सुरक्षेबाबत जागरूक करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थविरोधी विशेष कृती दल (एएनटीएफ), महाराष्ट्र राज्य, ज्योतिप्रिया सिंग यांनी केले.

पुणे विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागात आयोजित राष्ट्रीय "अन्वेषण प्राविण्य कार्यशाळेच्या" (इन्व्हेस्टिगेशन मास्टरक्लास) उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने तसेच पुनीत बालन समूहाच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. आगामी काळात अशा कार्यशाळांचे राष्ट्रीय स्तरावर विविध शहरांमध्ये आयोजन करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू), गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी), श्रीकांत पाठक, पोलीस उपमहानिरीक्षक, दहशतवादविरोधी पथक (एटीएस), अरविंद साळवे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. अरुण दातार, सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) द्वितीय समादेशक संजय शर्मा, भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचे प्रतिनिधी, ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीजचे प्रमुख डॉ. केतन अत्रे यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

ज्योतिप्रिया सिंग म्हणाल्या की, "सायबर गुन्हे केवळ आर्थिक नुकसान करत नाहीत, तर पीडित व्यक्तीला मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागते. अनेक वेळा त्याचे गंभीर परिणाम होऊन व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त होते. सायबर गुन्ह्यांमध्ये माणसाचे संपूर्ण आयुष्य विस्कळीत करण्याची क्षमता आहे. त्यामुळे वेळेत जनजागृती आणि योग्य प्रशिक्षण हेच या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचे सर्वोत्तम साधन आहे."

श्रीकांत पाठक यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत गुन्हेगारांनी गुन्हे करण्याच्या पद्धती पूर्णपणे बदलल्या आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सायबर गुन्हे केले जात आहेत. सर्वसामान्य नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी पुरेशी माहिती नसणे हे पोलीस यंत्रणेसमोरील मोठे आव्हान आहे.

अरविंद साळवे यांनी दहशतवादी कारवायांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचे नमूद केले. त्यामुळे सायबर सुरक्षा आणि संगणकीय अन्वेषण याबाबतचे प्रशिक्षण दहशतवादविरोधी पथकासाठीही अत्यंत महत्त्वाचे असून, त्याचा राष्ट्रीय सुरक्षेसाठी निश्चितच फायदा होईल, असे ते म्हणाले.

संजय शर्मा यांनी सायबर गुन्ह्यांविषयी समाजात सातत्याने जनजागृती व्हावी यासाठी अशा कार्यशाळा देशातील विविध शहरांमध्ये आयोजित होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. नागरिक जागरूक झाले तर सायबर गुन्ह्यांचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६


## ‘पाय नसलेली माणसं’ बद्दल - डॉ. सुधीर रा. देवरे

‘पाय नसलेली माणसं’ हा माझा पाचवा कवितासंग्रह ‘शब्दालय प्रकाशना’ने १७ मार्च २०२६ ला प्रकाशित केला, त्याबद्दल... ‘आदिम तालनं संगीत’ हा अहिराणी तर ‘डंख व्यालेलं अवकाश’, फुटूच लागतात पंख’, ‘भंग अभंग’ आणि आताचा ‘पाय नसलेली माणसं’ (मराठी) हा पाचवा कवितासंग्रह प्रकाशित. (‘संथ थंड संगाशी संग’बद्दल १ सप्टेंबरला लिहितो). कवितांच्या कमकुवत पायांत कलाविष्कारांचे पाऊलठस्से असतील तर ते स्वबळाने आधार घेत उद्याही अडखळत का होईना सावकाश चालत राहतील, अन्यथा निसर्गाच्या नियमाप्रमाणे थकून अवकाश मिळताच जमिनीवर दुबळी हाडं टाकून देतील, या स्थितीचं भान पायांना उपजतच आहे. कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत चं. प्र. देशपांडे म्हणतात, ‘डॉ. सुधीर देवरेंसह काही कवी वर्षानुवर्षांची जुनी असणारी ‘वैचारिक-भावनिक’ कोंडी फोडत आहेत. ‘उपयुक्तता’ (सामाजिक, राजकीय वा व्यक्तिगत) हे साध्य ओलांडून कविता आता ‘मानवी’ होण्याचे धाडस करू लागलेली आहे. ‘मानवी’ म्हणजे विशिष्ट व्यक्ती वा समूह यांच्यापुरत्या मर्यादित नसणाऱ्या कविता. सर्वच मानवांना व्यापणाऱ्या, समावेशक कविता. सार्वत्रिक समावेशक समस्या, प्रश्न यांना सामोऱ्या जाणाऱ्या, भिडणाऱ्या कविता. डॉ. देवरे यांच्या या कविता त्यामुळे व्यापक आशयाच्या झालेल्या आहेत. अनुभवाची स्थितिशीलता सोडून प्रवाही प्रक्रियांच्या कविता झालेल्या आहेत. स्थितिशील बौध्दीक साच्यांना इथे महत्व नाही. मराठीत अजूनही जोमात आणि रूढ असणाऱ्या स्वच्छंदी (रोमँटिक) मार्गाने जाणारी ही कविता नाही. स्वप्नीलपणा, भावनिकता, अलंकरण, पुन:प्रत्ययही इथे नाही. ही अधिक सर्जक व परिपक्व कविता आहे. या कवितांच्या अभिव्यक्तीची भाषा केवळ निसर्ग-घटितांतील प्रतिमांना प्राधान्य देणारी नसून एकूणच सृष्टीतील जगण्याला खुला वाव देणारी आहे. या व अशा कारणांमुळे, मराठीत या कवितांना वेगळी मूल्यात्मकता राहील.’ (संक्षिप्त). डॉ. मीनाक्षी पाटील म्हणतात, ‘या कवितेतून आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगानं एक कलात्मक खेळ खूप सहजतेनं खेळलेला दिसतो... आजच्या अस्वस्थ करणाऱ्या भवतालाविषयी फारच थोडे साहित्यिक आज थेट भूमिका घेतांना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर देवरे सर मात्र केवळ आपल्या कवितेतूनच नव्हे तर त्यांच्या सर्वच लेखनातून जीवन वास्तवाला थेट भिडण्याचा प्रयत्न करतांना दिसतात, आणि विशेष म्हणजे इतकं टोकदार मांडतांनाही त्यांच्या लेखनात कोणताही अभिनिवेश व्यक्त होतांना दिसत नाही. याचं प्रमुख कारण म्हणजे त्यांची चिंतनशीलता! जीवनानुभवांकडं साक्षीभावानं पाहत असल्यामुळं त्यांच्या कवितेतून एक गंभीर चिंतन अत्यंत सहजतेनं व्यक्त होतांना दिसतं. 'पाय नसलेली माणसं' या त्यांच्या नव्या काव्यसंग्रहात अनुभवांची अर्थपूर्णता आणि वेगळेपणा व्यक्त करणाऱ्या कवितांमधून एक आगळी प्रयोगात्मकता खूप सहजतेनं आली आहे... सत्याचं दर्शन झाल्यावरही त्या वेदनेला कुरवाळत न बसता, 'वाऱ्यावर स्वार होत मरेपर्यन्त जगत रहायचं आपण' अशी विजिगीषू वृत्ती दिसून येते. या संपूर्ण संग्रहात 'पाय' ही प्रतिमा खूपच वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळ्या प्रकारे आली आहे. माणसाचे 'दोन पाय' ते 'जगण्याचा पाया' या दोन बिंदूंतील तात्त्विक अधिष्ठानाला स्पर्श करणारी ही कविता वाचतांना वाचकाची एक वेगळीच सर्जनशील दमछाक होईल याची मला खात्री वाटते... जगण्याच्या वेगवेगळ्या छटा व्यक्त करतांनाही 'माणूस' होता आलं, की झालं आयुष्याचं सार्थक!' असं म्हणणारी ही कविता अगदी कमीतकमी शब्दांत जगण्याचं पसायदानच मागते! कारण आपल्या असण्या- नसण्यापेक्षाही 'माणूसपण' टिकणं महत्त्वाचं मानणारा हा कवी आहे. माणूसपणाला कुरतडणारं भौतिक वास्तव हे कवितागत निवेदकाला शारीर, मानसिक, आत्मिक अशा सर्व पातळ्यांवर अस्वस्थ करीत असतांनाही ऋतू पाहता येणं, संगीत ऐकता येणं, कविता वाचता- भोगता येणं आणि काळजातून बोलत वैश्विक प्रेम करता येणं, ही फार मोठी प्रतीती आहे असं ही कविता सांगते. या मौलिकतेमुळंच ही कविता आगळी वेगळी, अस्सल अनुभूतीची आणि आशयसंपन्न आहे.’ (संक्षिप्त). या संग्रहाच्या पाठराखण- ब्लर्बवर कवी लोकनाथ यशवंत म्हणतात, ‘सृष्टी ज्या वैश्विक पायांवर तगून उभी आहे, अशा पायांवर अर्थगर्भ भाष्य म्हणजे समृध्द कल्पनाविश्वातली ही समग्र कलात्मक कविता!... ‘पाय नसलेली माणसं’ या संग्रहातील बहुतांश कवितांमध्ये ‘पाय’ ही बहुअर्थी प्रतिमा, कुठं प्रतीक, तर कुठं रूपक होऊन येते. (कुठं जसाच्या तसा वास्तव मानवी-जैवीक अवयवही). आपल्यातल्या विविध व वेगळ्या परिप्रेक्षातल्या भौतिकी आणि अतिभौतिकी, अधू आणि तंदुरूस्त पायांवर ह्या कवितांत आदिम वेदनेचं मूल्यगर्भ चिंतन असून मुक्त काव्य, छंद, गूढ, अभंग, आशयघन, कलात्मकतेपासून ते अतिशय सहज सोप्या सरळ बोलीतल्या ओघवत्या शैलीतील चिंतनात्मक रचनेपर्यंतच्या संवेदनशील कविता ह्या संग्रहात वाचायला मिळतात. पाय नसूनही उंच भराऱ्या घेणारे लोक आणि सृष्टीतल्या अनेकार्थी पायांचं चित्रण ह्या प्रायोगिक नवकवितेत सतत होत राहतं.’ या संग्रहातील ३ कविता (निवडून नव्हे) मुद्दाम रसिकांसाठी देत आहे :रोज नदीत जाणारी लाकडं विसरून...बिळ दिसेल तिथं साप घुसेलमाहीत असुनही तुम्ही जिथं तिथंपोखरत बसता घुशींसारखं रोज... हात पाय बिळाजवळ जाताचसापाला घाबरुन पळता मागं...तरीही उकरण्याच्या पश्चात्तापाशिवायमेलेल्या बैलाचं शिंगडं जाळत स्वत:च घेत राहतात उग्र वास...साप दूर निघून गेल्याच्या समजुतीतआजूबाजूला नरम माती दिसताच पोखरू लागता उंदरांसारखं पुन्हारोज नदीत जाणारी लाकडं विसरून... *कडेलोटाची शक्यता!...निचटत्या पिरोटवरउभे असलेले लोकअजून तरीशेवाळल्या सरगोंडीतचजीव रोवून तग धरूनथरथरत्या पायांनी निसटाळा तोल सांभाळत,‘कोरा कागद निळी शाईअजून कोणाला भिती नाहीदगड की माती?’असं सारखं विचारलं जातंयअंगात आरी खोचत धक्का मारण्याआधी...जिवंत रहायचं असेलतर दगड वा मातीतून निवडावंच लागेल एकअन्यथा केव्हाही आरी ढोसूनचारी मुंड्या चित कडेलोटाची शक्यता!* शत्रूच नाही कोणीकाहीही ऐकूनविचार करायचा नाहीकाहीही पाहूनमत बनवायचं नाहीभोवतालच्या अंधारातपणती लावायची नाही...आपापल्या घरातउबदार वातावरणातरस्त्यानंही स्मित करतमस्त चालायचं डौलात... स्मशानातल्या निरोपालाप्रेताभोवती गर्दी तशी आपल्याही हयातीत... मृत्यू पावलेल्या व्यक्तीबद्दल भाषणात कोणी वांगलं बोलत नाहीम्हणून तसं पडून रहायचं, ‘भक्ती पंथेची’ सज्जन लोकांतआपल्याला शत्रूच नाही कोणीही आयुष्यभर सोयीनं आणि गर्वानं सांगायची गोष्ट...*

**शब्दालय प्रकाशन, मोबाईल : ९८२२५२५४४४)© डॉ. सुधीर राजाराम देवरेब्लॉगचा पत्ता : http://sudhirdeore२९.blogspot.com/**

## साहित्यरत्न अण्णाभाऊ

सांगली जिल्ह्यातील वाटेगावी,
अण्णा भाऊंचा जन्म झाला.
दीड दिवसाची शाळा शिकून,
साहित्यरत्न नावारूपास आला.

कथा, कादंबरी, लोकनाट्य पोवाडे,
असे साहित्यप्रकार हाताळले खूप.
शोषित, वंचित, पीडित नायकांचे
मराठी साहित्यात चित्रित केले रूप

गावकुसा बाहेरील माणसांना,
प्रस्थापित वर्गाने होते नाकारले.
अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीतून,
वंचित शोषितांच्या व्यथा साकारले.
माणसांच्या दु:ख दैन्य वेदनांना,
कथा कादंबरीतून दावली वाट.
डफावर थाप देऊनी आणली,
पोवाड्यातून विद्रोहाची लाट.

गावकुसा बाहेरील माणसे,
साहित्यातले नायक झाले.
जगण्यासाठी धडपडणाऱ्या,
वंचित लोकांचे चित्रण आले.

मराठी साहित्यातून प्रथम,
दाविला दैन्य दारिद्र्य सत्य.
प्रस्थापित वर्गाचे वागणे,
होते किती कुटील असत्य.

अण्णांनी जिवंत माणसांची,
साहित्यातून मांडली व्यथा.
शूरवीर लढवय्या माणसांची,
लिहिले साहित्यातून कथा.

लोकशाहीर अण्णाभाऊं साठेंना,
करूया सदैव हात जोडून वंदन.
अण्णाभाऊंनी साहित्यातून उठविले,
अन्याय अत्याचाराविरुद्ध रणकंदन.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


### प्रतिनिधी नेमणे आहे


महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ ऑगस्ट २०२६

# मैत्री : जीवनाला समृद्ध करणारे अमूल्य नाते

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे, असे आपण नेहमी म्हणतो. समाजात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रेम, आपुलकी, विश्वास, आधार आणि सहवासाची गरज असते. आई-वडील, भाऊ-बहिण, नातेवाईक ही रक्ताची नाती जन्मतः लाभतात; परंतु एक असे नाते आहे, जे कोणत्याही रक्तसंबंधावर आधारित नसते, कोणत्याही बंधनात अडकलेले नसते आणि तरीही आयुष्यभर माणसाला सुख-दुःखात साथ देत राहते. ते म्हणजे मैत्रीचे नाते. मैत्री ही माणसाच्या जीवनातील सर्वांत सुंदर, निर्मळ आणि निरपेक्ष भावना आहे. आनंदाच्या क्षणी आनंद द्विगुणित करणारी आणि दुःखाच्या क्षणी धीर देणारी शक्ती म्हणजे मैत्री होय. म्हणूनच जगभरात दरवर्षी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी 'मैत्री दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ शुभेच्छा देण्याचा किंवा मैत्रीचे बँड बांधण्याचा नसून, जीवन समृद्ध करणाऱ्या या अनमोल नात्याचा सन्मान करण्याचा दिवस आहे.मानवी संस्कृतीच्या विकासाच्या इतिहासात मैत्रीला नेहमीच महत्त्वाचे स्थान राहिले आहे. आदिमानवापासून आधुनिक समाजापर्यंत माणसाने एकत्र राहणे, परस्परांना मदत करणे आणि संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे याच भावनेतून समाजजीवनाचा विकास झाला. या प्रवासात मैत्री ही केवळ दोन व्यक्तींमधील भावना न राहता समाजाच्या ऐक्याचा, सहकार्याचा आणि विश्वासाचा आधार बनली. मैत्री ही स्वार्थावर नव्हे, तर विश्वास, प्रामाणिकपणा, समर्पण आणि परस्पर आदरावर उभी असते. म्हणूनच खरी मैत्री काळाच्या कसोटीवर टिकून राहते.मैत्री दिनाच्या इतिहासाकडे पाहिले असता, विसाव्या शतकाच्या प्रारंभी या संकल्पनेची सुरुवात झाल्याचे दिसून येते. मित्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एक स्वतंत्र दिवस असावा, अशी कल्पना मांडण्यात आली. पुढे विविध देशांमध्ये ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिन साजरा करण्याची परंपरा रूढ झाली. काळाच्या ओघात या दिवसाला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. आज विविध देशांत वेगवेगळ्या तारखांना किंवा पद्धतीने मैत्री दिन साजरा केला जात असला, तरी त्यामागील मूलभूत उद्देश एकच आहे— माणसामाणसांतील विश्वास, प्रेम, सहकार्य आणि सौहार्द अधिक दृढ करणे.आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात माणसाकडे सर्व प्रकारची भौतिक साधने आहेत; परंतु मानसिक समाधान, आत्मीयता आणि भावनिक आधार यांची कमतरता अनेकांना जाणवते. अशा वेळी एक सच्चा मित्र माणसासाठी मोठी संपत्ती ठरतो. अनेक वेळा आपण आपल्या मनातील भावना कुटुंबीयांपेक्षाही मित्राशी अधिक मोकळेपणाने व्यक्त करू शकतो. कारण मैत्रीमध्ये कोणतीही औपचारिकता नसते. मित्र आपल्याला जसे आहोत तसे स्वीकारतो. आपल्या यशात मनापासून आनंद व्यक्त करणारा आणि अपयशाच्या वेळी धीर देणारा मित्र जीवनातील सर्वांत मोठा आधार असतो.खऱ्या मैत्रीची ओळख सुखाच्या काळात होत नाही; ती संकटाच्या वेळी होते. संपत्ती, पद, प्रतिष्ठा किंवा परिस्थिती बदलली तरी जो मित्र आपल्या पाठीशी ठामपणे उभा राहतो, तोच खरा मित्र असतो. जीवनात अनेक परिचित, सहकारी किंवा ओळखीचे लोक भेटतात; परंतु प्रत्येकजण मित्र असतोच असे नाही. मैत्री ही विश्वासाने, सहवासाने आणि परस्पर समजुतीने निर्माण होते. ती एका दिवसात तयार होत नाही, तर काळाच्या ओघात अधिक दृढ होत जाते.भारतीय संस्कृतीमध्ये मैत्रीला अत्यंत उच्च स्थान देण्यात आले आहे. आपल्या पुराणांमध्ये, महाकाव्यांमध्ये आणि लोकपरंपरेत मैत्रीची अनेक प्रेरणादायी उदाहरणे आढळतात. श्रीकृष्ण आणि सुदामा यांची मैत्री ही त्यातील सर्वांत श्रेष्ठ मानली जाते. गरिबी आणि श्रीमंती यांतील प्रचंड अंतर असूनही त्यांच्या मैत्रीमध्ये कधीही स्वार्थाचा लवलेश नव्हता. श्रीकृष्णाने सुदाम्याच्या प्रेमाचा, निष्ठेचा आणि आत्मीयतेचा केलेला सन्मान आजही मैत्रीचा सर्वोच्च आदर्श मानला जातो. त्याचप्रमाणे श्रीराम आणि सुग्रीव, श्रीराम आणि निषादराज गुह, तसेच भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातील परस्पर विश्वासाचे नाते भारतीय संस्कृतीतील मैत्रीचे आदर्श उदाहरण म्हणून सांगितले जाते.भारतीय संतपरंपरेतही मैत्रीला महत्त्वाचे स्थान आहे. संतांनी मानवतेचा संदेश देताना सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने आणि समतेच्या भावनेने वागण्याचा उपदेश केला. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि इतर संतांच्या विचारांमध्ये माणसामाणसांतील स्नेहभाव, सहकार्य आणि समतेची भावना सातत्याने दिसून येते. खरी मैत्री कोणत्याही जाती, धर्म, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक स्थितीच्या सीमा मानत नाही. ती केवळ माणुसकीला महत्त्व देते.साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रातही मैत्री हा अनेक लेखक, कवी आणि कलावंतांचा आवडता विषय राहिला आहे. मराठी साहित्यामध्ये अनेक कथा, कादंबऱ्या आणि कवितांमधून मैत्रीचे विविध पैलू उलगडले गेले आहेत. कधी बालमैत्रीचे निरागस रूप, कधी संघर्षातील साथ, कधी त्याग, तर कधी आयुष्यभर टिकणारी आत्मीयता अशा विविध स्वरूपात मैत्रीचे चित्रण साहित्यामध्ये दिसते. कारण प्रत्येकाच्या आयुष्यात मैत्रीचा अनुभव वेगळा असला, तरी तिची भावना सार्वत्रिक आहे.बालपणातील मैत्री विशेष निरागस असते. शाळेतील बाकावर बसताना, खेळाच्या मैदानात धावताना, अभ्यास करताना किंवा एखादी छोटीशी गोष्ट वाटून घेताना निर्माण होणारे मैत्रीचे नाते अनेकदा संपूर्ण आयुष्यभर टिकून राहते. त्या आठवणी माणसाला आयुष्यभर आनंद देतात. काळ बदलतो, परिस्थिती बदलते, व्यवसाय बदलतात; परंतु बालमैत्रीची ओल मनात कायम राहते. म्हणूनच अनेकजण आयुष्याच्या उत्तरार्धातही आपल्या जुन्या मित्रांचा शोध घेतात आणि त्या नात्याला पुन्हा उजाळा देण्याचा प्रयत्न करतात.महाविद्यालयीन जीवनात निर्माण होणारी मैत्री व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावते. याच काळात विचारांची देवाणघेवाण, विविध उपक्रमांमध्ये सहभाग, सामाजिक जाण आणि नेतृत्वगुण विकसित होतात. मित्र एकमेकांना प्रेरणा देतात, चुका दाखवून देतात आणि योग्य मार्गावर चालण्याची ताकद देतात. त्यामुळे चांगल्या मित्रांची निवड ही प्रत्येक तरुणासाठी अत्यंत महत्त्वाची असते.आजच्या वेगवान जीवनात मैत्रीचे महत्त्व पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे. मानसिक तणाव, स्पर्धा, एकाकीपणा आणि वाढत्या अपेक्षांच्या वातावरणात एक विश्वासू मित्र माणसाला नव्याने जगण्याची प्रेरणा देतो. म्हणूनच मैत्री ही केवळ सामाजिक नाती दृढ करणारी भावना नसून मानसिक आरोग्य, भावनिक स्थैर्य आणि आनंदी जीवनाचा भक्कम पाया आहे.काळ बदलला, तंत्रज्ञान विकसित झाले, जीवनशैलीत आमूलाग्र परिवर्तन झाले; परंतु मैत्रीचे मूल्य आजही तेवढेच कायम आहे. उलट आधुनिक जीवनातील वाढती स्पर्धा, व्यावसायिक धावपळ, ताणतणाव आणि एकाकीपणामुळे मैत्रीची गरज अधिक प्रकर्षाने जाणवू लागली आहे. आज प्रत्येक व्यक्ती यशाच्या शर्यतीत धावत असताना अनेकदा भावनिक आधाराची उणीव जाणवते. अशा वेळी एक सच्चा मित्र जीवनाला नव्याने उभारी देतो. मित्र हा केवळ आनंद साजरा करणारा सहकारी नसतो, तर संकटात धीर देणारा, योग्य सल्ला देणारा आणि चुकीच्या मार्गावर जाण्यापासून परावृत्त करणारा हितचिंतक असतो. म्हणूनच खऱ्या अर्थाने मित्र म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा असे म्हटले जाते.विद्यार्थी जीवनात मैत्रीचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात निर्माण होणारे मैत्रीचे संबंध व्यक्तीच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासात मोलाची भूमिका बजावतात. अभ्यासातील अडचणी दूर करणे, स्पर्धा परीक्षांची तयारी, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, सामाजिक उपक्रम आणि विविध जबाबदाऱ्या पार पाडताना मित्र एकमेकांना प्रोत्साहन देतात. अनेक यशस्वी व्यक्ती आपल्या जीवनप्रवासात मित्रांनी दिलेल्या प्रेरणेचा उल्लेख अभिमानाने करतात. कारण योग्य मित्रांच्या सहवासातून आत्मविश्वास वाढतो, नेतृत्वगुण विकसित होतात आणि सहकार्याची भावना दृढ होते.तथापि, मैत्रीचे महत्त्व जितके मोठे आहे, तितकीच मित्र निवडताना विवेकाची आवश्यकता आहे. संत तुकाराम महाराजांनी "संगतीचे फळ" यावर विशेष भर दिला आहे. चांगल्या संगतीमुळे व्यक्तिमत्त्व घडते, तर वाईट संगतीमुळे जीवनाची दिशा बदलू शकते. व्यसनाधीनता, गुन्हेगारी, हिंसक प्रवृत्ती किंवा चुकीच्या सवयींची सुरुवात अनेकदा अयोग्य मित्रपरिवारातून होत असल्याची उदाहरणे समाजात दिसून येतात. त्यामुळे मैत्री करताना व्यक्तीचे चारित्र्य, मूल्ये, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक दृष्टिकोन यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. खरा मित्र आपल्या चुकीला पाठिंबा देत नाही; उलट ती सुधारण्याचे धैर्य दाखवतो.आजच्या डिजिटल युगात मैत्रीचे स्वरूपही मोठ्या प्रमाणात बदलले आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप, एक्स, टेलिग्राम यांसारख्या सामाजिक माध्यमांमुळे जगभरातील लोकांशी काही क्षणांत संपर्क साधणे शक्य झाले आहे. हजारो 'फॉलोअर्स' किंवा 'फ्रेंड्स' असणे ही आज प्रतिष्ठेची बाब मानली जाते. परंतु आभासी जगातील प्रत्येक ओळख ही खरी मैत्री असतेच असे नाही. अनेकदा सोशल मीडियावरील संबंध केवळ औपचारिक किंवा तात्पुरते ठरतात. प्रत्यक्ष भेट, परस्पर विश्वास, संकटातील साथ आणि भावनिक जिव्हाळा यांशिवाय मैत्री पूर्णत्वास जात नाही. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा योग्य उपयोग करताना प्रत्यक्ष मानवी नात्यांचे महत्त्व जपणे ही काळाची गरज आहे.सामाजिक माध्यमांमुळे संवादाचे नवे मार्ग खुले झाले असले तरी त्यातून काही गंभीर आव्हानेही निर्माण झाली आहेत. तुलना, दिखाऊपणा, अफवा, सायबर फसवणूक, बनावट ओळखी आणि मानसिक ताण यामुळे अनेक तरुण त्रस्त होत आहेत. अशा परिस्थितीत खरी मैत्री ही केवळ ऑनलाइन संदेशांपुरती मर्यादित न राहता विश्वास, संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष सहवासावर आधारित असावी. मित्रांच्या यशाचा हेवा न करता त्यात आनंद मानणे, त्यांच्या अडचणींमध्ये वेळ देणे आणि गरजेच्या वेळी प्रत्यक्ष मदतीसाठी धावून जाणे, हीच मैत्रीची खरी कसोटी आहे.भारतीय समाज विविधतेने नटलेला आहे. भाषा, धर्म, जात, संस्कृती, प्रांत आणि परंपरा यांमध्ये वैविध्य असूनही मैत्री ही या सर्व सीमांपलीकडे जाणारी भावना आहे. विविध पार्श्वभूमीतील लोकांमध्ये निर्माण होणारी मैत्री सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुभाव दृढ करण्यास मदत करते. शाळा, महाविद्यालये, कार्यस्थळे, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक चळवळी या सर्व ठिकाणी विविध समाजघटकांतील मैत्रीमुळे परस्पर समज, सहिष्णुता आणि सहकार्याची भावना विकसित होते. त्यामुळे मैत्री ही केवळ वैयक्तिक आनंदाची बाब नसून सामाजिक ऐक्याचीही मजबूत पायाभरणी आहे.इतिहासातही मैत्रीची अनेक प्रेरणादायी उदाहरणे आढळतात. स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांनी एकमेकांवरील विश्वास आणि सहकार्याच्या बळावर संकटांचा सामना केला. सामाजिक सुधारणा चळवळींमध्येही विचारसरणी, ध्येय आणि समाजसेवेच्या भावनेतून निर्माण झालेल्या मैत्रीने मोठे परिवर्तन घडवून आणले. समान ध्येयासाठी एकत्र येणारे सहकारी पुढे आयुष्यभराचे मित्र बनतात आणि त्यातून समाजहिताचे अनेक उपक्रम साकार होतात.मैत्रीचे नाते केवळ समान वयाच्या व्यक्तींमध्येच निर्माण होते असे नाही. गुरु-शिष्य, सहकारी, शेजारी, कुटुंबातील सदस्य आणि अगदी दोन पिढ्यांमधील व्यक्तींमध्येही परस्पर आदर, विश्वास आणि आत्मीयतेतून मैत्री फुलू शकते. वय, पद, संपत्ती किंवा सामाजिक स्थान या गोष्टी खऱ्या मैत्रीमध्ये कधीच अडथळा ठरत नाहीत. मनांची जवळीक, विचारांचे साधर्म्य आणि एकमेकांविषयीचा आदर हेच मैत्रीचे खरे अधिष्ठान असते.जागतिकीकरणाच्या युगात विविध देशांतील नागरिकांमध्येही मैत्रीचे बंध अधिक दृढ होत आहेत. विद्यार्थी विनिमय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक देवाणघेवाण, संशोधन, पर्यटन आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध संस्कृतीतील लोक एकमेकांच्या अधिक जवळ येत आहेत. अशा मैत्रीमुळे जागतिक शांतता, सहकार्य आणि परस्पर आदराची भावना वाढीस लागते. त्यामुळे मैत्री हा केवळ वैयक्तिक अनुभव नसून जागतिक बंधुभावाचा प्रभावी संदेशही आहे.जीवनातील अनेक प्रसंग माणसाला मित्रांचे महत्त्व नव्याने जाणवून देतात. आजारपण, आर्थिक अडचण, अपयश, नैराश्य किंवा कौटुंबिक संकट अशा कठीण काळात जे लोक निःस्वार्थपणे साथ देतात, त्यांचे स्थान जीवनात कायमचे अढळ बनते. म्हणूनच संपत्तीपेक्षा चांगले मित्र हीच खरी जीवनातील सर्वांत मोठी कमाई मानली जाते. पैसा, पद आणि प्रतिष्ठा यांचे महत्त्व काळानुसार बदलते; परंतु सच्च्या मैत्रीची ऊब आयुष्यभर मनाला बळ देत राहते.अशा या मैत्रीच्या नात्याला अधिक संवेदनशील, अधिक विश्वासार्ह आणि अधिक मूल्याधिष्ठित बनविण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. मैत्री ही केवळ आनंदाचा उत्सव नसून जबाबदारी, समर्पण आणि माणुसकीची जपणूक आहे. ही भावना जिवंत राहिली तर समाज अधिक सुसंवादी, सहकार्यशील आणि आनंदी बनेल.मैत्री दिन हा केवळ शुभेच्छा संदेश पाठविण्याचा, भेटवस्तू देण्याचा किंवा मनगटावर मैत्रीचा बँड बांधण्याचा दिवस नाही. हा दिवस आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान असलेल्या मित्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, जुन्या नात्यांना नव्याने उजाळा देण्याचा आणि नव्या पिढीला मैत्रीतील मूल्यांची जाणीव करून देण्याचा दिवस आहे. आधुनिक जीवनात वेळेअभावी अनेकदा माणूस आपल्या जिवलग मित्रांपासून दूर जातो. व्यावसायिक जबाबदाऱ्या, शिक्षण, नोकरी, स्थलांतर आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे भेटीगाठी कमी होतात; परंतु खऱ्या मैत्रीची ताकद अंतरात नसून मनांच्या जवळकीत असते. अनेक वर्षे भेट न झाल्यानंतरही ज्या नात्यात आत्मीयता कायम राहते, तीच खरी मैत्री होय.आजच्या पिढीसमोर अनेक संधी आहेत, परंतु त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. वाढती स्पर्धा, करिअरची धडपड, मानसिक ताण, नैराश्य, एकाकीपणा आणि डिजिटल जगातील कृत्रिम संबंध यांमुळे तरुणांमध्ये भावनिक अस्थिरता वाढताना दिसते. अशा परिस्थितीत एक समंजस, संवेदनशील आणि विश्वासू मित्र अनेकदा समुपदेशकाची भूमिका बजावतो. मित्राचे एक प्रेमळ शब्द, योग्य वेळी दिलेला धीर किंवा संकटाच्या क्षणी दिलेली साथ एखाद्या व्यक्तीच्या जीवनात मोठा सकारात्मक बदल घडवू शकते. त्यामुळे मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही सुदृढ मैत्री अत्यंत महत्त्वाची ठरते.मैत्रीचा पाया परस्पर विश्वासावर उभा असतो. विश्वास तुटला की मैत्रीचे अस्तित्व धोक्यात येते. म्हणून मैत्रीमध्ये प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि परस्पर आदर या मूल्यांचे जतन करणे आवश्यक आहे. मित्राच्या यशाचा आनंद साजरा करणे, त्याच्या अपयशात त्याला धीर देणे, चुका दाखवून देताना संवेदनशीलता राखणे आणि गरजेच्या वेळी निःस्वार्थपणे मदतीला धावून जाणे, हीच खरी मैत्रीची ओळख आहे. केवळ आनंदाच्या क्षणी सोबत राहणारा नव्हे, तर संकटात खंबीरपणे उभा राहणारा मित्रच आयुष्यभर स्मरणात राहतो.कुटुंब आणि समाज यांच्यामध्येही मैत्रीची भावना महत्त्वाची आहे. कुटुंबातील सदस्यांमध्ये जर परस्पर मैत्रीचे नाते निर्माण झाले, तर संवाद अधिक मोकळा होतो, गैरसमज कमी होतात आणि विश्वास वाढतो. पालकांनी मुलांशी केवळ शिस्त लावणाऱ्या व्यक्तीप्रमाणे नव्हे, तर समजून घेणाऱ्या मित्राप्रमाणे संवाद साधला, तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने वागल्यास शिक्षण अधिक प्रभावी बनते. त्यामुळे मैत्री ही केवळ समान वयाच्या व्यक्तींमधील भावना नसून समाजातील प्रत्येक नात्याला समृद्ध करणारे मूल्य आहे.समाजात वाढत चाललेली असहिष्णुता, मतभेद, हिंसा आणि तणाव यांवर मात करण्यासाठीही मैत्रीचा दृष्टिकोन आवश्यक आहे. विविध धर्म, जाती, भाषा, संस्कृती आणि विचारसरणी असलेल्या लोकांनी परस्पर आदर, संवाद आणि सहकार्याची भावना स्वीकारली, तर समाजात शांतता आणि सौहार्द अधिक दृढ होईल. राष्ट्राची एकात्मता आणि लोकशाहीची मजबुती हीदेखील नागरिकांमधील विश्वास, बंधुभाव आणि मैत्रीच्या भावनेवरच अवलंबून असते. म्हणूनच मैत्री हा केवळ वैयक्तिक जीवनाचा विषय नसून सामाजिक परिवर्तनाचा आणि राष्ट्रीय ऐक्याचा आधारस्तंभ आहे.भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा स्वीकार केला आहे. त्यातील बंधुता ही संकल्पना प्रत्यक्षात मैत्री, परस्पर आदर आणि सहजीवनाच्या भावनेवर आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने वागविणे, मतभेद असूनही माणुसकी जपणे आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हीच बंधुभावाची खरी अभिव्यक्ती आहे. त्यामुळे मैत्रीचे मूल्य हे केवळ वैयक्तिक नात्यांपुरते मर्यादित नसून लोकशाही समाजव्यवस्थेच्या यशासाठीही अत्यावश्यक आहे.पर्यावरण संवर्धन, रक्तदान, वृक्षारोपण, आपत्ती व्यवस्थापन, ग्रामविकास, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्याय यांसारख्या अनेक क्षेत्रांत मित्रांच्या समूहाने एकत्र येऊन उल्लेखनीय कार्य केलेली अनेक उदाहरणे आपल्या समाजात पाहायला मिळतात. समान ध्येय, निःस्वार्थ सेवा आणि परस्पर सहकार्य या भावनेतून उभे राहिलेले असे मैत्रीचे बंध समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणतात. त्यामुळे मैत्री ही केवळ दोन व्यक्तींमधील भावनिक नाते नसून समाजहितासाठी कार्य करणारी प्रेरणादायी शक्तीही आहे.आज मैत्री दिन साजरा करताना केवळ औपचारिक शुभेच्छांवर समाधान न मानता आपल्या मित्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची आवश्यकता आहे. अनेकदा आपल्या जीवनात मोठे योगदान देणाऱ्या मित्रांना आपण धन्यवादही म्हणत नाही. या दिवशी जुन्या मित्रांना आठवणे, त्यांची विचारपूस करणे, गैरसमज दूर करणे, तुटलेली नाती पुन्हा जोडणे आणि नव्या पिढीला निःस्वार्थ मैत्रीचे महत्त्व समजावून सांगणे, हीच या दिवसाची खरी सार्थकता ठरेल.संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे, "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले". ही भावना केवळ दयाभावाची नसून खऱ्या मैत्रीचीही आहे. दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे, त्याच्या अडचणीमध्ये सहभागी होणे आणि अपेक्षारहितपणे मदतीचा हात पुढे करणे, हेच मैत्रीचे खरे तत्त्वज्ञान आहे. स्वार्थ, स्पर्धा आणि दिखाऊपणाच्या युगात ही मूल्ये जपणे हीच काळाची सर्वात मोठी गरज आहे.मैत्री हा जीवनाला मिळालेला अमूल्य आशीर्वाद आहे. पैसा, पद, सत्ता आणि प्रसिद्धी यांचे महत्त्व काळानुसार बदलत जाते; परंतु सच्च्या मित्राचा सहवास आयुष्यभर मनाला आधार देत राहतो. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या जीवनात मैत्रीची बीजे प्रेम, विश्वास, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि माणुसकीच्या पाण्याने सतत जोपासली पाहिजेत. अशा मैत्रीमुळे व्यक्ती आनंदी होते, कुटुंब सुदृढ होते, समाज सुसंवादी बनतो आणि राष्ट्र अधिक बळकट होते. यंदाचा मैत्री दिन केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर माणुसकी, विश्वास आणि बंधुभाव यांचा नव्याने संकल्प करण्याचा दिवस ठरावा, हीच या दिनानिमित्त सर्वांसाठी मंगल शुभेच्छा.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल — bagate.rajendra5@gmail.com**